




दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७


● बीड/महाराष्ट्र ● शनिवार ६ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २३३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# आयपीएस कमलेश मीना यांची दंबग कारवाई

## पत्त्याच्या क्लबवर धाड ! ३१,७४,२८० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**वादळवार्ता/बीड**

दिनांक ४.४.२०२४ रोजी सायंकाळी २०.०० वा दरम्यान सहा पोलीस अधीक्षक कमलेश मीना साहेब, उपविभाग केज यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे मांजरसुंबा येथे हॉटेल राधिका येथे काही इसम आपल्या स्वताचे फायदयासाठी बेकायदेशीर रित्या लोकाकडुन पैसे घेवुन तीरर्ट नावाचा जुगार खेळत व खेळवीत आहेत अशी गुप्त बातमी मा. सहा पोलीस अधीक्षक कमलेश मीना साहेब, उपविभाग केज यांना मीळाल्याने सदर ठीकाणी कार्यवाही करणेसाठी पोलीस अधिकारी सपोनि गोसावी साहेब, पोउपनि पानपाटील, पोउपनि गटुवार, पोलीस अंमलदार १३८४ चोपणे, पो अं ८९३ मुंढे, पोअ १०५७ पाशा, पोअ १५४७ इनामदार, पो अं २२७४ वडणे, पो अं २३२ क्षिरसागर, पो अं १६८८ सापपुते, पोना १८९७ राऊत पो अं ४४४ ढाकणे, हे खाजगी वाहनाने मांजरसुंबा येथे जावुन बीड ते सोलापुर जाणारे रोडच्या पुढील पुर्व बाजुस असलेल्या हॉटेल राधिका चे तळ घरात २०.३० वा सुमारास अचानक छापा मारला असता त्या ठीकाणी चार टेबल मीळुन आले ते एकुण १९ जण असल्याची खात्री झाल्याने आम्ही त्यांना जागीच बसन्यास सांगीतले व त्यांनी तीन पानी तिर्ट नावाचा जुगार खेळत असल्याचे सांगीतले, सदर ठिकाणी अभिनव क्रीडा मंडळ येथे क्रीडा मंडाळाचे अध्यक्ष व सचिव यांनी लायसन नुतनिकरण नसताना त्या ठिकाणी मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशाचे उल्लंघन करून बेकायदकशिररित्या तिरट नावाचा जुगारखेळतअसतानामिळुनआले. १.)भगवान चंद्रकांत गरड रा. भुम ता भुम जि. धाराशिव २.) तात्यासाहेब अंबादास बहीर रा. पारगाव ता वाशी जि धाराशिव ३)अशोक सुधाकर घुले रा. टाकळी ता केज जि बीड ४) अनिल ज्ञानोबा करडुले रा सफेपुर ता जि बीड ५.) सदाशिव उत्तम बीकड रा फक्राबाद ता वाशी जि धाराशिव६.) आनंत शंकर शिनगारे रा. येळंबघाट




ता जि बीड ७.)सदिप पीलाजी गोरे रा बार्शीनाका बीड ता जि बीड ८.) जगदीश बाबासाहेब जगताप रा. शाहुनगर बीड ९.) संतोष अंबदास सोनवणे रा चौसाळा ता जि बीड १०.) किशारे अशोक मोराळे रा फक्राबाद ता वाशी जि धाराशिव ११)तात्यासाहेब आत्माराम आमटे रा जैताळवाडी ता जि बीड १२) प्रकाश रुपा राठोड रा नाळवंडी ता जि बीड १३)नितीन भगवान शिनगारे रा येळंबघाट ता जि बीड१४)जालीदर भिवा त्रीमुखे रा नांदुरघाट ता केज जि बीड १५.)सुभम सुरेश चव्हाण रा आय टी आय कॉलेज बीड १६.) योगेश युवराज घुले रा रुई ता वाशी जि धाराशीव १७.) भिमा रामकीसन वाघमारे रा. नाळवंडी ता. जि बीड १८.) राम ज्ञानोबा भोसले रा. भुम ता भुम जि. धाराशिव १९ ) दशरथ राजाराम त्रीमुखे रा. नांदुर ता केज जि बीड व ईतर लोक सहा सात लोक यातील आरोपी क्रमांक ०१ ते १९ याचे ताब्यात मुद्देमाल ३१,७४, २८०/- मुदेमाल मीळुन आल्याने तसा मा. सहा पोलीस अधीक्षक उपविभाग केज यांचे आदेशाने सविस्तर जप्ती पंचनामा पोउपनि गट्टुवार यांनी दोन पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला आहे म्हणुन नमुद आरोपींता विरुदध गुरनं- ८१/२०२४ महाराष्ट्र जुगार अधिनियम १८८७ कलम ४,५ सह १८८ भादवी प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक साहेब बीड, मा. अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाई, यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा. पोलीस अधिक्षक कमलेश मीना साहेब, सपोनि चंद्रकांत गोसावी साहेब, पोउपनि अजय पानपाटील, पोउनि नितीन गटुवार, पोलीस अंमलदार १३८४ चोपणे, पो अं ८९३ मुंढे, पोअ १०५७ पाशा, पोअ १५४७ इनामदार, पो अं २२७४ वडणे, पो अं २३२प्रशांत क्षिरसागर, पो अं १६८८ महादेव सापपुते, पोना १८९७ अनिल राऊत पो अं-४४४ बालासाहेब ढाकणे यांनी केली आहे.

## अंबाजोगाई येथे भिमसे आप्पा लोमटे नवाब यांच्या वतीने रोजा इफ्तार व स्नेह भोजनास कार्यक्रमास मुस्लिम धर्मियांची उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

अंबाजोगाई शहरातील सामाजिक कार्यकर्ते भिमसे आप्पा लोमटे नवाब यांच्या वतीने मुस्लिम बांधव व इतर धर्मियांसाठी रमजान महिन्याच्या निमित्ताने रोजा इफ्तार व स्नेहभोजन कार्यक्र माचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहर व परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गेल्या अनेक वर्षापासून भिमसे आप्पा लोमटे नवाब सबा फंक्शन हॉल रविवार पेठ परिसरात इफ्तार पार्टी व स्नेह भोजनाचे आयोजन करतात.भिमसे लोमटे यांच्या



वतीने बुधवार दि.०३ एप्रिल २०२४ रोजी सबा फंक्शन हॉल या ठिकाणी मुस्लिम धर्मियांचा पवित्र असा रमजान महिना सुरू आहे. त्यानिमित्ताने, रोजा इफ्तार पार्टी व स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास भिमसेन आप्पा लोमटे नवाब माजी उपनगराध्यक्ष बबन भैय्या लोमटे कृष्णा लोमटे यांच्यासह हजारो मुस्लिम बांधव व हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## शरद पवार गटाचे बीडचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांचे पिंपळवंडी-अंमळनेर येथे भव्य स्वागत

वादळवार्ता/पाटोदा

शरद पवार गटाकडून बीड लोकसभा निवडणुकीसाठी बजरंग बप्पा सोनवणे यांना उमेदवारी देण्यात आली. बजरंग बप्पा सोनवणे मुंबईहून बीडकडे जात असताना अंमळनेर-



पिंपळवंडी येथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे बजरंग बाप्पा सोनवणे यांचे दि.५ एप्रिल शुक्रवार रोजी दुपारी १२ वाजता आगमन होताच त्यांचे तोफा वाजवून व पुष्पहार घालून व फेटा बांधून भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी बजरंग सोनवणे म्हणाले की, मला मतदानरुपी आशिर्वाद देऊन निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी आ.संदीप क्षिरसागर, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस अध्यक्ष(शरद पवार गट) मेहबूब शेख,तालुका अध्यक्ष शिवभूषण जाधव,तालुका ज्येष्ठ अध्यक्ष किसन पवार,तालुका युवक अध्यक्ष विनोद पवार,बालाजी सोनवणे आदीसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार सघाच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदी मुबाशीर खतीब यांची निवड



वादळवार्ता/केज

राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदी पत्रकार मुबाशीर खतीब यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढागळे, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव ,राज्यसचिव निलेश ठाकरे व शंकर सिंह ठाकुर मराठवाडा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार बीड न्युज १ चे संपादक मुबाशीर खतीब यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या " मराठवाडा उपाध्यक्ष " पदी निवड करण्यात आली आहे.विवीध पत्रकार संघात आजवर विविध पदावर केलेल्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.त्यांच्या निवडीबद्दल मित्रपरिवार, पत्रकार बांधव यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येते आहे.

## कुणालाही गावबंदी करता येणार नाही : जिल्हाधिकारी नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई होणार



**वादळवार्ता/परवेज पटेल**

बीड आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही नेत्याला कोणालाही व कुठेही गावबंदी करता येणार नाही. नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. असा इशारा पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी दिला आहे. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जिल्ह्यातील कोणत्याही गावाला गावबंदी करता येणार नाही. जिल्ह्यात गावबंदीचे कुठलेही फलक लावता येणार नाही. अशा प्रकारचे फलक असल्यास ते काढून घ्यावेत. न्यायालयाची अवहेलना केली असल्यास कायदेशीर कारवाई करावी. असे निर्देश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी पोलिसांना दिले आहेत. गुरुवारी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने कायदा व सुव्यवस्थेची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## पत्रकारांवर हल्ला करणा-या बिडकिन येथील नऊ गुटखा माफियांचा जिल्हा सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला ; आरोपी फरार

पैठण तालुक्यातील बिडकिन येथील दै.आत्ताच एक्सप्रेसचे प्रतिनिधी अर्शद अहेमद हे २० फेब्रुवारी रोजी आपले नित्याचे कामे आटोपुन उद्योग मित्र चितेगाव येथुन बिडकीन बस स्थानकावर सायंकाळी सहा वाजे दरम्यान थांबलेले असता बिडकीन येथील गुटखा माफीया रशीदखांन दाऊद खॉन नासेर दाऊद खॉ. युसुफ याकुब पठाण, असलम हनीफ पठाण, हनीफ दाऊद पठाण, परवेज पठान, अरबाज पठान, आवेश पठान, असलाम पठान पैकी प्रथम रशीद पठाण, नासेर पठाण, युसुफ पठाण, यांनी पत्रकार अर्शद अहेमद यांना आडवुन शिव्या दील्या. पत्रकार अर्शद अहेमद यांनी अवैध धंदया विरोधात दै. आत्ताचे एक्सप्रेस मध्ये बातम्या प्रकाशीत केली होती. बिडकिन पोलीसांनी धाड टाकुन कार्यवाही केल्याप्रकरणी याचा राग मनात धरुन सदर माफीयांनी सर्व साथीदांराचा जमाव गोळा करुन पत्रकार अर्शद अहमद शेख यांच्या वर प्राण घातक हल्ला करीत मार डालो साले को बहुत बातम्या लगाता है म्हणत लोंखडी रॉड ने हल्ला केला व गंभीर जख्मी केले होते. यात उजवा हाथ निखळला होता. बिडकीन ग्रामीण रुग्णालयात प्रथोमउपचार करुन शासकीय रुग्णालय मध्ये दाखल केले नंतर बिडकीनच्या खाजगी रुग्णालयात उपचारा नतंर २३ फेब्रुवारी रोजी रात्री बिडकीन पोस्टेला लेखी तक्रार दाखल केली. २५ रोजी पुरवणी जवाब अंती गुन्हा दाखल केला. भा.द. वि.च्या कलम ३२४ / ३२५ . सह अन्य कलमा सह पत्रकार संरक्षण कायदयान्वये गुन्हा दाखल केला होता. वैदयकीय अहवाल उशिरा मिळाल्याने त्यात गंभीर दुखापत व जीवे मारण्याचा उद्देश स्पष्ट होत असल्याचे निष्पन्न झाल्याने कलम ३२६ ची कलम वाढ झाल्याने बिडकीन पोलीसांनी मा. जिल्हा सत्र न्यायालयात अहवाल सादर केला मात्र तत्पुर्वीच आरोपीनी कोर्टा कडुन कलम ३२४/ ३२५ च्या जामीन पात्रावरुन कोर्टा कडुन जामीन मिळवला मात्र कलम ३२६ आजामीनपात्र कलम कायम असल्याने मा. कोर्टाने यांना तात्पुरता मिळवलेला जामीन रद्द केला असल्यामुळे सर्व आरोपी फरार झाले असुन बिडकीन पोलीस तपास करीत आहे .

## संपादकीय

# सूर्यनारायण आग ओकत आहे

उन्हाळ्यातील कडक ऊन त्वचेसाठी खूप हानिकारक आहे. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे आपल्या त्वचेला सनबर्न, टॅनिंग आणि मुरुमांसारख्या समस्या उद्भवू लागतात. उन्हामुळे आपला चेहराही कोरडा आणि निर्जीव दिसू लागतो. यंदा सन २०२४साली खुप कडक उन्हाळा असण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. वाटते की सूर्यनारायण आग ओकत आहे की काय? त्यामुळे आपणच आपली काळजी घेणे इष्ट ठरणार आहे. खबरदारीचा इशारा देणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख सेवेत... संपादक.

यावर्षी एवढे भयंकर कडक ऊन पडत आहे. झाडांची कोवळी-ओली-हिरवी पाने दुपारी चिंबलेली दिसत आहेत. ऊन्हात फिरल्यास ऊन्हाचे असह्य चटके बसत आहेत. मागील मार्च महिन्यातच असे हाल होते. गर्दीचे रस्ते निर्जन दिसत असत. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याची चिंता प्रत्येकांनी स्वतःच घेणे अत्यावश्यक वाटत आहे. आता एप्रिल अखेर आणि मे महिन्यातील तापमानाची तीव्रता यंदा मार्च महिन्यापासूनच जाणवायला लागली. तापमानाने चाळीशी पार केली असून राज्यात उष्णतेची लाट भडकली आहे. अधेमध्ये अवकाळी पाऊसही धुमाकूळ घालत आहे, मात्र उष्णता नावालाच कमी होत आहे. उष्माघात म्हणजे उष्णतेचा आघात होय. इंग्रजीत त्याला सनस्ट्रोक म्हणतात. या व्याधीत सुरुवातीला चक्कर, डोकेदुखी, मळमळ-उलटी, पोटात वेदना, गोंधळलेली अवस्था ही सामान्य लक्षणे रुग्णामध्ये पहायला मिळतात. याकडे दुर्लक्ष केल्यास जीवही गमवावा लागतो. जास्त वेळ उन्हात काम केल्याने शारीरिक समस्या निर्माण होऊ शकते. त्यातील गंभीर प्रकार म्हणजे उष्माघात- हिट एक्झॉशन आणि उष्माघात- हिट स्ट्रोक होय. सतत कडाक्याच्या उन्हात काम केल्यानंतर उष्माघात होतो. त्यातून होणारी तीव्र समस्या म्हणजेच उष्माघात होय. शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा उष्णता शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. ऊन आणि गरम हवेच्या झोतामध्ये काम करावे लागले किंवा तीव्र उष्णतेच्या संपर्कात गेल्यास शरीरातील तापमान नियंत्रित करणारी हायपोथॅलॅमससमधील यंत्रणा कोलमडून पडते आणि

# विश्वातील मानव ज़ातीची स्वास्थ्यवर्धक संस्था!

[आंतरराष्ट्रीय आरोग्य दिवस विशेष.]

डब्ल्यूएचओच्या व्यापक आदेशात सार्वभौमिक आरोग्य सल्ला, सार्वजनिक आरोग्याच्या जोखमीवर देखरेख, आरोग्य आपत्कालीन प्रतिक्रियांचे समन्वय, मानवी आरोग्य प्रसार यांचा समावेश आहे. डब्ल्यूएचओने सार्वजनिक आरोग्यासाठी केलेल्या अनेक कामांमध्ये प्रमुख भूमिका बजावली आहे, विशेषतः रोग निर्मूलन, पोलिओचे निर्मूलन आणि इबोला, कोरोना लसीचा विकास आदी. त्याच्या सद्य प्राधान्यांमध्ये संसर्गजन्य रोगांचा समावेश आहे, त्यात एचआयव्ही- एड्स, इबोला, मलेरिया आणि क्षयरोग यांची वर्णी लागते. आणखी सविस्तर माहितीसाठी वाचा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी यांचा हा लेखनप्रपंच... संपादक.

डब्ल्यूएचओ सरकारी आरोग्य धोरणाला दोन उद्दीष्टांसह संबोधित करतो- पहिली गोष्ट म्हणजे, आरोग्य समानता वाढवणारी, गरीब-समर्थक, लिंग-प्रतिसाद देणारी आणि मानवी हक्कांवर आधारित दृष्टीकोन एकत्रित करणारी धोरणे, कार्यक्रमांद्वारे आरोग्याच्या मूलभूत सामाजिक आणि आर्थिक निर्धारकांना संबोधित करणे होय. तर दुसरे म्हणजे, आरोग्यदायी वातावरणाला चालना देणे, प्राथमिक प्रतिबंध तीव्र करणे आणि आरोग्यास होणाऱ्या पर्यावरणाच्या धोक्यांमागील मूळ कारणांवर लक्ष केंद्रित करणे यासाठी सर्व क्षेत्रातील सार्वजनिक धोरणांवर परिणाम करणे होय. डब्ल्यूएचओच्या तेरापैकी- ओळखल्या गेलेल्या पॉलिसी क्षेत्रांपैकी उर्वरित दोन डब्ल्यूएचओच्या भूमिकेशी संबंधित आहेत- जागतिक आरोग्य अजेंडा पुढे नेण्याच्या दृष्टीने डब्ल्यूएचओचे आदेश पार पाडण्यासाठी नेतृत्व, शासन, गती, भागीदारी व देश, संयुक्त राष्ट्र प्रणाली आणि इतर भागधारकांसह सहकार्य मजबूत करणे असते. डब्ल्यूएचओला एक लवचिक शिक्षण संस्था म्हणून विकसित करणे, टिकवून ठेवणे आणि त्याचे कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडण्यास सक्षम करणे महत्त्वाचे आहे. विश्व स्वास्थ्य संस्था ही आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात सुसंवादाचे कार्य करणारी संयुक्त राष्ट्रांची एक विशेष संस्था आहे. ती दि.७ एप्रिल १९४८ रोजी स्थापन झाली. स्वित्झर्लंडमधील जिनिव्हात मुख्यालय असणाऱ्या या संस्थेने एका अर्थी राष्ट्रसंघाचे एक उपांग असणाऱ्या आरोग्य संस्थेचे कार्य पुढे चालविले जात आहे.

आंतरराष्ट्रीय संघटना सन १९४५च्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेदरम्यान चीनच्या प्रतिनिधी स्झमिंग स्झे यांनी नॉर्वे ब्राझीलच्या प्रतिनिधींना नवीन संयुक्त राष्ट्रांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्था तयार करण्याचे काम दिले. या विषयावर ठराव मंजूर करण्यात अपयशी ठरल्यानंतर परिषदेचे सरचिटणीस अल्जर हिस यांनी अशी संघटना स्थापन करण्याच्या घोषणेचा वापर करण्याची शिफारस केली. स्झे आणि इतर प्रतिनिधींनी आरोग्याविषयी आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविण्याची घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेच्या घटनेवर संयुक्त राष्ट्रांच्या सर्व ५१ देशांनी आणि इतर १० देशांनी दि.२२ जुलै १९४६ रोजी स्वाक्षरी केली. अशाप्रकारे ही संयुक्त राष्ट्रांची पहिली विशेष संस्था बनली. त्याची स्थापना दि.७ एप्रिल १९४८ रोजी पहिल्या जागतिक आरोग्य दिनावर औपचारिकपणे अंमलात आणली. नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितीतील जागतिक आरोग्य संघटनेचे मुख्य उद्दीष्ट हे आहे, की जीवनाचे टाळण्यासारखे नुकसान, रोग आणि अपंगत्वाचे ओझे कमी करण्यासाठी देश आणि इतर भागधारकांशी समन्वय साधणे. तब्बल १९४ सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी बनलेल्या डब्ल्यूएचए एजन्सीची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था म्हणून ती काम करते. ३४ आरोग्यतज्ञ कार्यकारी मंडळाची निवड करून त्यांना सल्ला देते. डब्ल्यूएचए अधिवेशन महासंचालक निवडणे, ध्येय, प्राधान्यक्रम, बजेट आणि क्रियाकलाप मंजूर करण्यास जबाबदार असतो. विद्यमान महासंचालक टेड्रोस अँधानम, माजी आरोग्यमंत्री आणि इथिओपियाचे परराष्ट्रमंत्री यांनी दि.१ जुलै २०१७ रोजी पाच वर्षांचा कार्यकाळ सुरू केला. दि.२३ जून १८५१ रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय स्वच्छता संमेलन, डब्ल्यूएचओचे पहिले पूर्ववर्ती होते. सन १८५१ ते १९३८ या काळात झालेल्या १४ परिषदांच्या आंतरराष्ट्रीय मालिका, आंतरराष्ट्रीय स्वच्छता संमेलने यांनी कॉलेरा, पिवळा ताप यांसारख्या अनेक रोगांचा सामना करण्याचे काम केले. संमेलन यशाच्या परिणामी, पॅन-अमेरिकन स्वच्छता विभागाने आणि आंतरराष्ट्रीय कार्यालय- डी स्वच्छता पब्लिक लवकरच स्थापन करण्यात आले. सन १९२० मध्ये लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली, तेव्हा त्यांनी आरोग्य संघटनेची स्थापना केली.

दि.५ मे २०१४ रोजी डब्ल्यूएचओने जाहीर केले, की पोलिओचा प्रसार हा जागतिक आरोग्य आणीबाणी आहे- आशिया, आफ्रिका आणि मध्य पूर्व या रोगांचा प्रादुर्भाव विलक्षण मानला गेला. दि.८ ऑगस्ट २०१४ रोजी डब्ल्यूएचओने जाहीर केले, की इबोलाचा प्रसार हा सार्वजनिक आरोग्य आणीबाणी आहे; ते गिनियामध्ये सुरू झाले. असा विश्वास होता, की हा उद्रेक जवळपासच्या इतर देशांमध्ये जसे की लाइबेरिया आणि सिएरा लिओनमध्ये पसरला होता.

दि.३० जानेवारी २०२० रोजी डब्ल्यूएचओने कोरोना- कोविड-१ हा साथरोग सर्व देशभर किंवा खंडभर असलेला सार्वजनिक आरोग्याची आणीबाणी म्हणून आंतरराष्ट्रीय चिंता जाहीर केली, हे येथे वाखाणण्याजोगेच म्हणावे लागेल! !! विश्व स्वास्थ्य संस्था स्थापना दिनाच्या सर्वांना निरामय हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.

## संतांचे ग्रंथच मनुष्याच्या जीवन कल्याणाचे साधन आहेत - ह.भ.प. चैतन्य महाराज देगलुरकर

## संत सावता महाराज प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न



वादळवार्ता/अंबाजोगाई

संतत्व सिद्ध करून झालेले अनंत संत मांदियाळीत आहेत. संत तेथे देव ही परिपूर्णता आहे ती साधल्यासच आचार विचार आणि संस्कार आत्मसात होतात व त्यांचे ग्रंथ हे मनुष्याच्या कल्याणाचे साधन आहेत असे मत संत साहित्याचे अभ्यासक, प्रवचनकार, किर्तनकार ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी व्यक्त केले. ते अंबाजोगाईत माळीनगर भागातील संत सावतामाळी मंदीरात श्री.विठ्ठल रुक्मिणी, संत सावता महाराज प्राण प्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्या निमित्ताने हरीभक्तीपर सुश्राव्य किर्तनात शुक्रवारी उपदेशपर बोलत होते. पुढे ते म्हणाले की, आपल्या जीवनात ईश्वराचे ,संताचे अधिष्ठान हवे संतांच्या सानिध्यात राहिल्यास जीवन सार्थकी लागते आशिर्वाद प्राप्त झाल्यास यश संपादन करता येते. संत सावतामाळी यांची देवाप्रति दृढ भक्ती होती त्यांचे भजन म्हणजे भक्तीचा मळा होते. जीवन कर्मामध्ये प्रवृत्त होण्यासाठी संत सावता माळी यांनी ईश्वरीय अनुभवाचे चिंतन करून सिध्दी प्राप्त करून घेतली.अशा प्रकारच्या विविध संतांनी निर्माण केलेले ग्रंथ हे मनुष्याच्या जीवन कल्याणाचे साधन असल्याचे सांगून वारकरी सांप्रदाय हा भक्ती आणि परंपरेचा वारसा तर आहेच पण भक्ताला बळही देणारी सात्विकता त्यात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी सकाळच्या सत्रात ह.भ.प.चैतन्य महाराज देगलुरकर यांच्या हस्ते व सुभाष कुलकर्णी,उदय कुलकर्णी,अमोल घोडके, विनोद निकम आदीसह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न झाला. या सर्व कार्यक्रमास अनेक महिला,पुरुष भक्त भाविक शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या धार्मिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संत सावता महाराज भजनी मंडळ, संगम गणेश मंडळ यासह अनेकजण परीश्रम घेत आहेत.

# आधी सहा दिवस परिक्षा घेतली मग केला गौरव वारकरी प्रस्थानत्रयी मुखोद्गत गौरव योजना गाथा मंदिर देहू !राष्ट्रसंत गोविंद गिरीजी महाराज यांचे हस्ते ५१००० चा धनादेश व सन्मानपत्र

## सोहंम अमझरेनी वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी नवू हजार ओव्याची ज्ञानेश्वरी केली कंठस्थ !

वादळवार्ता/शिरूर कासार

वयाच्या नवव्या वर्षी नवू हजार ओव्याचा ग्रंथ ज्ञानेश्वरी कंठस्थ केला या अलौकिक कामगिरी श्रीक्षेत्र देहू येथे बुधवारी तुकाराम बीजेची पर्वणी साधून वारकरी प्रस्थानत्रयी मुखोद्गत गौरव योजना गाथा मंदिर ने आधी सहा दिवस सोहंमकडून ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचून घेतला या सहा दिवसात त्याने ग्रंथ न पहाता "ओम नमो जी आद्या पासुन ते थेट आता विश्वात्मके देवे " पर्यंत ग्रंथ वाचन केला. सहा दिवसाच्या या परिक्षेनंतर सोहंम अमझरेचा राष्ट्रसंत गोविंद गिरी महाराज व गाथा मंदिराचे प्रमुख पांडूरंग बुवा घुले यांचे हस्ते गाथा मंदिर विश्वस्थाकडून ५१००० चा धनादेश व प्रशस्ती पत्र देऊन गौरव केला . चिमुकल्याच्या कौतुक सोहळ्यास आई वडीलांची उपस्थिती ! देहू येथे झालेल्या सोहंमच्या कौतुक सोहळ्यास त्याचे वडील वारकरी सांप्रदायाचे पाईक पुंजाराम अमझरे व सोहंमची आई सिमा अमझरे आवर्जुन उपस्थित होते,सोहंमवर हे धर्मसंस्कार करणा-या मातापित्यांना धन्यता देत त्यांचाही सन्मान केला .साहजिकच त्यांचे आनंदाश्रू




ईंद्रायणीच्या पाण्यात एकरूप झाले होते . या कार्यक्रमास गाथा मंदिराचे प्रमुख विश्वस्थ पांडूरंगबुवा घुले सह प्रख्यात किर्तनकार ,वारकरी मंडळी मोठ्या संखेने उपस्थित होते. ज्ञानेश्वरीचा कधीही विसर पडू नये , माझेकडून अव्याहतपणे सेवा घडावी हीच माऊलीच्या चरणी प्रार्थना असल्याची भावना सोहंमने यावेळी व्यक्त केली .

# डॉ .दीपाली पुरी तालुका आरोग्य अधिकारी तर गौरव पुरी सहाय्यक कक्ष अधिकारी
# पुरी बहिण-भावाचा तरुणाई पुढे आदर्श

वादळवार्ता/गेवराई

महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत डॉ. दीपाली चंद्रकांत पुरी हिची तालुका आरोग्य अधिकारीपदी तर धाकटे बंधू गौरव चंद्रकांत पुरी याची एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून सहाय्यक कक्ष अधिकारी मंत्रालय, मुंबई येथे निवड झाली आहे .

येथील आर बी अट्टल महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा चंद्रकांत पुंडलिक पुरी यांचे मोठे चिरंजीव वैभव पुरी हा एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेतून राज्य कर निरीक्षक (एसटीआय) पदी माझगाव मुंबई येथे रुजू आहेत . तर मोठी कन्या डॉ . दीपाली पुरी ( जोशी ) ही महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनि आरोग्य विभागात मानगाव (रायगड ) येथे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून तर धाकटा मुलगा गौरव पुरी हा सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून मंत्रालय मुंबई येथे निवड झाली आहे . प्रा . सी . पी . पुरी यांच्या कुटुंबातील तिन्ही मुलांची अधिकारी होण्याची बाब ही अभिमानास्पद व गौरवशाली आहे . या निवडीबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ .प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ . सतीश चव्हाण, मंडळाचे उपाध्यक्ष माजी आ. अमरसिंह पंडित, बीड जि . प . माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, प्राचार्य प्रोफेसर डॉ . रजनी शिखरे, सेवानिवृत्त भाऊसाहेब जोशी, उपप्राचार्य, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी , मित्र परिवार यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत .





# डॉ.सौ.मनीषा मुंडे- चौरे डी.एन.बी. पदवी परीक्षेत यश



वादळवार्ता/अंबाजोगाई

अंबाजोगाई येथील उद्योजक गोरख (बापू) मुंडे यांची कन्या डॉ. सौ.मनिषाताई मुंडे-चौरे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील स्त्रीरोग व प्रसूती विषयातील महत्त्वाची समजली जाणारी डी.एन.बी.पदवी परीक्षेत यश संपादन केले असून त्यांच्या यशाबद्दल अंबाजोगाई शहर व परिसरातून आणि वडवणी तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे.

अंबाजोगाई शहरात व्यवसायाच्या निमित्ताने दाखल झालेले गोरख (बापू) मुंडे यांनी आपल्या तीनही मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन सक्षम बनवले. उद्योजक गोरख (बापू) मुंडे यांचे मुळगाव चिखल बीड ता. वडवणी आहे. अंबाजोगाईत आपल्या कर्तुत्वाची छाप उमटविली आहे. शिक्षणाच्या बाबतीत गोरखंबापू मुंडे व त्यांच्या अर्धांगिनी सौ. शालिनीताई मुंडे यांनी मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवले आहे. त्यांची ज्येष्ठ कन्या डॉ .मनिषाताई मुंडे-चौरे यांनी वैद्यकीय शिक्षण घेत बारामती येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा केली. नोकरी मिळाली म्हणून त्यांनी शिक्षण थांबवले नाही. एमबीबीएसचे शिक्षण झाल्यावर त्यांनी अंतरवासीता सुरू असताना अभ्यास करुन बीड येथील शासकीय डी.जी.ओ. ही पदविका प्राप्त केली. त्यानंतर पुढील शिक्षण घेत याच विषयातील पुढची व महत्त्वाची पदवी असलेली डी.एन.बी. पदवीचा अभ्यासक्रम सुरू केला. दोन वर्षाचा हा अभ्यासक्रम पूर्ण करून या विषयातील पदवी परीक्षेत त्या उत्तीर्ण झाल्या आहेत. या परीक्षेचा निकाल दि.४ एप्रिल गुरुवार रोजी घोषित करण्यात आला आहे. डॉ.मनिषाताई यांच्या यशाबद्दल खा.डॉ. प्रितमताई मुंडे,माजी मंत्री पंकजाताई मुंडे ,आ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ पत्रकार रामभाऊ कुलकर्णी,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी आ.केशव दादा आंधळे, राजाभाऊ मुंडे, सोमनाथ भाऊ बडे, ओमकेश दहिफळे, बंडू गित्ते,डॉ. अनिल केंद्रे, प्रा.कमलाकर लोमटे,पत्रकार दत्तात्रय अंबेकर, हनुमंत आप्पा पोखरकर,माजी उपनगराध्यक्ष दिलीपदादा सांगळे, अंगदराव कराड, रवींद्र मोदी , इंजि. संतोष मुंडे ,पत्रकार परमेश्वर गित्ते यांच्यासह इतरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## वीज दरवाढ सरकारने आदेश देऊन कमी करा नसता (उबाठा) शिवसेनेच्या वतीने आंदोलन

वादळवार्ता/पाटोदा

सध्या वीज कंपनीने केलेली दरवाढ ही सामान्य नागरिकांना परवडणारी नसून ०१ एप्रिल पासून दर लागू केलेले असून एवढ्या घाईघाईमध्ये वीज दरवाढीचा वरवंटा महाराष्ट्रातील समान जनतेवर फिरवला आहे. अशी कोणती आणिबानी सरकारवर आली. त्यामुळे घरगुती वीज ग्राहकावर वीज बिलाचा बोझा १० ते ६५ रुपयांनी वाढणार आहे. शेतकऱ्यासाठी ही दरवाढ २० ते ३० पैसे प्रती युनिट असेल. व्यावसायिक व औद्योगिक वीज ग्राहकांना व रुग्णालयांना याचा फटका बसणार आहे. तरी सरकारने तात्काळ वीज दरवाढ कमी करून कंपनीला आदेश द्यावेत अन्यथा शिवसेना (उबाठा) पाटोदा तालुका आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. असे निवेदन पाटोदा तहसील कार्यालय येथे (उबाठा) शिवसेनेच्या वतीने देण्यात आले.यावेळी तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे, सय्यद फारुख (लल्लुशहा) युवा तालुकाप्रमुख अजिंक्य



डोरले,जिल्हाउपप्रमुख कृष्णा चौरे, सोमनाथ लवूळ,सतिष शिंदे उपस्थित होते.मोक्ष म्हणजे मोकळ होणे. संसारात माणसे मोकळे होत नाहीत कारण त्यांचे संसारात राहिलेले असते. त्यात ते गुंतून राहतात .मोक्षाकरिता आपण आपले काम, क्रोधादिक विकार घालवावेत. मोक्षासाठी पूर्वपुण्य आवश्यक असून, वैराग्याने ब्रह्मज्ञान होते व त्यानंतर मोक्ष मिळतो. इहलोक व परलोक मनात आणू नयेत. जगत हे जगत न दिसता ते ब्रह्म स्वरूप दिसावे. विषय स्वरूप दिसू नये. ब्रह्मज्ञानी हे परोक्ष ज्ञान आहे. संत हे अपरोक्ष ब्रह्मज्ञान याचे ज्ञान ते करून देतात. तो कसा तर बहुबरा बहुबरा/म्हटले आहे. संतांच्या संगतीत शोधून वाईट गुण मिळत नाहीत. त्यांच्या संगतीत जे पाहिजे तेच म्हणजे आत्मसंगती असते. जगत ,जीव ,परमार्थ, आत्मा बद्दल नेहमी चर्चा करावी. संत हे त्यांना मिळालेला ब्रह्मानंद ते स्वतः घेतात व इतरांनाही वाटतात .आपण परमात्मा स्वरूप होणे म्हणजेच काला आहे. यासाठी साधकाने फक्त चालावे. पळू व उधळू नये .साधनेत राहून आपल्या स्वरूपात विलीन व्हावे असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी हरिभक्ति परायण नारायण महाराज डिसले महंत संत ज्ञानेश्वर आश्रम दगडवाडी, शिवानंद महाराज येवले ,रामहरि रसाळ गुरुजी विभागीय प्रवक्ता ,व अनंत घीगे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अखिल भारतीय वारकरी मंडळ, डॉक्टर भाऊसाहेब महाराज नेटके संत पीठ पैठण, डॉक्टर अरुण महाराज वाळके, डॉक्टर सुभाष महाराज खेत्रे, मृदंग मणी म्हणून कृष्णा महाराज खोले, गोरख महाराज कोकाटे, पांडुरंग महाराज खोपडे बीड तर असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

## निवडणुकीसह दुष्काळ निवारणाचा कामेही करावी: जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी

वादळवार्ता/बीड

निवडणुकीसह दुष्काळ निवारणाचे कामे ही करावी असे निर्देश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी माजलगाव येथील आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना दिले. 39 बीड मतदार संघातील 229माजलगाव विधानसभा मतदार संघा ची पाहणी आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली.



यावेळी त्यांनी घेतलेल्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या बैठकीस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार वर्षा मनाळे तसेच सर्वच विभागातील कार्यालयीन प्रमुख यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात पाणीटंचाईची असून नीट व्यवस्थापन करून पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना कमी पोहोचतील अशी व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. माजलगाव धरणाला भेट देऊन इथली प्रत्यक्ष परिस्थिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाणून घेतली. तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाचे नीट नियोजन करावे आणि मागील त्याला काम मिळेल असे व्यवस्थापन करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माजलगाव विधानसभा मतदारसंघातील स्ट्राँग रूम ही मुलींची शासकीय वस्तीगृह येथे तयार करण्यात आले असून या ठिकाणची ची पाहणी करून सुरक्षात्मक उपायांची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. माजलगाव तहसील कार्यालयात निवडणुकी संदर्भात वेगवेगळे कक्ष स्थापन झाले असून या कक्षांना यावेळी त्यांनी भेटी दिल्या तसेच जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक साहित्याची तपासणीही केली. 39 - बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव येथील सादोळा रोड केसापुरी कॅम्प येथील निगराणी पथकाची (SST)पाहणी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली.

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी पतसंस्थेस मार्च २०२४ अखेरिस ५.३६ लाखांचा निव्वळ नफा

वादळवार्ता/अंबाजोगाई

अंबाजोगाई पंचक्रोशीतील महिलांचे आर्थिक उदात्तीकरण करून त्यांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी सुरू केलेल्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेस ३१ मार्च २०२४ अखेर ५.३८ लाखांचा नफा झाल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ . सुनीता राजकिशोर मोदी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे . आपला भारत देश हा पुरुष प्रधान संस्कृतीचा देश आहे .देशात महिलांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे महिला नेहमी घर, चूल आणि मूल यामध्येच गुरफटून पडल्याचे दिसून येते. यातून महिलांना बाहेर काढून त्यांना आर्थिक स्वायत्तता उपलब्ध करून देण्यासाठी या पतसंस्थेची निर्मिती करण्याचे ठरले.त्याचप्रमाणे महिलांचा आर्थिक स्तर उंचावून त्याचा फायदा कुटुंबाला व्हायला हवा याच पवित्र हेतूने केवळ महिलांसाठीच संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेची निर्मिती करण्यात आल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनीता राजकिशोर मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली.

पतसंस्थेस उपाध्यक्षा डॉ.राजश्री राहुल धाकडे, संचालिका धर्मपात्रे रुपाली सुधीर ,खडकभावी शोभा बाबू ,सरवदे संगीता विष्णू , मसने उषा गणेश, मस्के अंजली विष्णुपंत , रापतवार सविता विजय , खंडाळे सुरेखा बाबुराव , फारोखी परवीन नुजहत, चोकडा जमुना जयप्रकाश आणी मोहिते सायली सुहास यांचे सहकार्य लाभत आहे .

३१ मार्च २०२४ अखेर पतसंस्थेच्या सभासदांची संख्या ही ३४७४ एवढी असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. त्याचबरोबर संस्थेचे भागभांडवल हे रुपये २७ लाख एवढे जमा असून संस्थेचा स्वनिधी हा रुपये ४० लाख एवढा आहे. वर्षाखेरीस पतसंस्थेच्या एकूण ठेवी या रुपये ४ कोटी ३३ लाख असल्याचे सांगून मार्च २०२४ अखेर पतसंस्थेने समाजातील महिलांना ३ कोटी २६ लाख रुपयांचे अर्थसहाय्य करून त्यांचा पर्यायाने त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केला आहे. सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेची अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेत २ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.तसेच पतसंस्थेचा स्वनिधी हा रुपये ४० लाख एवढा जमा असल्याची माहिती अध्यक्षा सौ सुनीता राजकिशोर मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

३१ मार्च २०२४ अखेर पतसंस्थेस ५.३६ लाख रुपयांचा नफा झाल्याचे अध्यक्षा सुनीता मोदी यांनी सांगत या यशाचे सर्वस्वी श्रेय पतसंस्थेचे मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांच्यासह पतसंस्थेच्या ठेवीदार , सभासद आणि महिलांनी घेतलेल्या अर्थसहाय्याचा वेळेवर परतावा यालाच द्यावे लागेल असेही मत सौ.सुनीता मोदी म्हणाल्या.



बीड : शहरातील जालना रोड परिसरात लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी खा.डॉ. प्रीतमताई मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपळवंडी येथे इफ्तार पार्टी संपन्न

वादळवार्ता/पाटोदा

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे पवित्र रमजान महिना निमित्त मुस्लिम बांधवांना दि.३ एप्रिल बुधवार रोजी बंडू आण्णा पवार व अजित पवार दि.४ एप्रिल गुरुवार रोजी भाऊसाहेब पवार (रानमळा) तर दि.५ एप्रिल शुक्रवार रोजी सरपंच निलेश मोरे यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम-हिंदू बांधवांनी उपस्थिती दर्शविली व इफ्तार पार्टीच्या माध्यमातून मुस्लिम-हिंदू एकतेचा संदेश देण्यात आला.या कार्यक्रमाला चेअरमन शिवाजी पवार,उपसरपंच दादासाहेब पवार,अशोक गुजर,अजित पवार,राजू मोरे,सुरेश पवार,दादासाहेब पवार,विनोद पवार,विलास पवार, शेखर पवार,सुनील पवार,गोकुळ राऊत,संतोष पवार,अनिल पवार, बिबिशन पवार,आश्रूबा जरे,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,रुपेश जरे, शेख बाबासाहेब,शेख युसुफ सर,लियाकत राज,शेख चांद भाऊसाहेब,शेख बशीर, अमजद शेख,अकील शेख,फकीर गयास,शाबुद्दिन सय्यद,सलीम सय्यद,शाहरुख शेख आदीसह हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# सविधान रक्षक रॅलीचे १४ एप्रिल रोजी बीड वकील संघातर्फे आयोजन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती बीडच्या वकील संघा मार्फत साजरी होनार-अँड.प्रशांत राजापूरकर

वादळवार्ता/बीड

बीड वकील संघातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती बीड येथील न्यायालय परिसरात सकाळी साडेसात वाजता साजरी करण्यात येणार आहे.

मान्यवर व्यक्तीच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर मान्यवर व्यक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अपरिचित पैलूवर प्रकाश टाकून वैचारिक मांडणी करतील, त्यानंतर वकील संघातर्फे संविधान रक्षक मोटरसायकलीचे आयोजन केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुतळ्याजवळ वकील संघातर्फे विनम्र अभिवादन करण्यात येईल तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करण्यात येईल अशी माहिती प्रसिद्धी पत्रकार द्वारे बीड वकील संघाचे अध्यक्ष अँड.प्रशांत राजापूरकर यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिलेली आहे.प्रसिद्धी पत्रकात पुढे असे म्हटले आहे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी देशात आणि जगभरात साजरी केली जाते भारतीय संविधानाने दिलेली मूल्य आणि तत्व सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष स्वातंत्र्य समता बंधुत्व आणि न्याय याची जोपासना करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे वरील मूल्य व तत्वांना विकसित करणे हे वकिलाचे आद्य कर्तव्य आहे बीड वकील संघातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रेरणादायी परिवर्तनवादी आणि समतेचे विचार समाजापर्यंत प्रचार आणि प्रसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत झाला पाहिजे यासाठी बीड वकील संघ अनेक वर्षापासून कार्यरत आहे.सदरील कार्यक्रमास सर्व वकील बंधू आणि भगिनींनी वेळेवर उपस्थित राहावे असे बीड वकील संघाचे अध्यक्ष अँड प्रशांत राजापूरकर उपाध्यक्ष अँड दीपक तांगडे सचिव अँड एकनाथ काकडे सहसचिव अँड विठ्ठल शेळके कोषाध्यक्ष अँड आनंद कुलकर्णी ग्रंथपाल अँड इमरान शेख महिला प्रतिनिधी अँड सायली सुतार यांनी कळविले आहे.



दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता

## वंचितच्या वतीने पंजाबराव डख यांचा उमेदवारी अर्ज दाखल



वंचित बहुजन आघाडीच्यावतीने परभणी लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र राज्यातील हवामान तज्ज्ञ तथा हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.


यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोकराव हिंगे, सुरेश शेळके, धर्मराज चव्हाण, सुनीताताई साळवे, सुरेश फड, शुद्धोदन सावंत, मनोहर व्हावळे, सुमित जाधव, निवृत्ती केदारे, जिजाराम भालेराव, मुंजाजी टोम्पे, मिलिंद कांबळे, दिलीप मोरे, तुकाराम भारती, शिवाजी वाकळे, रणजित मकरंद, प्रमोद कुट्टे, शाम काळे आणि डॉ.नितिन सोनवणे, पुरुषोत्तम वीर,संजय दराडे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रपतींनी लॉन्च केली देशातील पहिली स्वदेशी CAR T-Cell थेरपी

## कमी खर्चात उपलब्ध होणार कर्करोगावरील उपचार

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/पंकज भंडारी**

कर्करोग हा जागतिक स्तरावर वेगाने वाढणारा गंभीर आजार आहे, ज्याचा धोका वर्षानुवर्षे वाढत आहे. कर्करोगाच्या मृत्यूचे प्रमाण देखील जास्त आहे, ज्याबद्दल आरोग्य तज्ञ वेळोवेळी सतर्क करतात. आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे एक प्रमुख कारण म्हणजे वेळेवर निदान आणि उपचारांचा अभाव. देशातील बहुतेक लोकांमध्ये, कर्करोगाचे निदान शेवटच्या टप्प्यात होते, तेथून उपचार करणे आणि रुग्णाचा जीव वाचवणे खूप कठीण होते. भारतातही कर्करोग हा मोठा धोका आहे.दरम्यान, भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) बॉम्बे, पवई येथे आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी कर्करोग उपचारासाठी स्वदेशी विकसित CAR T-cell थेरपी लॉन्च केली. आयआयटी बॉम्बे आणि टाटा मेमोरियल सेंटर यांनी विकसित केलेली ही जीन-आधारित थेरपी विविध प्रकारचे कर्करोग बरे करण्यास मदत करेल.द लॅन्सेट रीजनल हेल्थ साउथईस्ट एशिया जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, २०१९ मध्ये भारतात जवळपास १२ लाख नवीन कॅन्सरची प्रकरणे आणि ९.३ लाख मृत्यूची नोंद झाली आहे. भारत हा आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. CAR टी-सेल थेरपीमुळे कर्करोगाच्या उपचारात मदत होऊ शकते, अशी आशा आरोग्य तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.*मेड इन इंडिया थेरपीने कर्करोगावर उपचार दरम्यान, NexCAR१९ CAR टी-सेल थेरपी ही भारतातील पहिली 'मेड इन इंडिया' CAR टी-सेल थेरपी आहे, ज्यामुळे उपचारांच्या खर्चात लक्षणीय घट होण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत, तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आणि एआयमुळे कर्करोगाच्या उपचारात मोठे यश मिळाले आहे, जरी जास्त किमतीमुळे सामान्य लोकांपर्यंत त्याची उपलब्धता कठीण झाली आहे. मात्र, शास्त्रज्ञांना आशा आहे की *या नवीन पद्धतीच्या मदतीने कर्करोगावर उपचार करणे सोपे होईल.थेरपी ९० टक्के कमी किमतीत उपलब्ध असेल थेरपीच्या उदघाटनावेळी, महामहिम राष्ट्रपती



म्हणाल्या की, या स्वदेशी थेरपीची किंमत इतरत्र उपलब्ध असलेल्या थेरपीपेक्षा ९० टक्के कमी आहे. ही जगातील सर्वात स्वस्त CAR-T सेल थेरपी आहे. शिवाय, हे 'मेक इन इंडिया' उपक्रमाचे एक उदाहरण आहे, जे स्वावलंबी भारतासाठी वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. आम्हाला आशा आहे की, या थेरपीच्या मदतीने देशाला आगामी काळात कर्करोगाशी लढण्यासाठी बळकटी मिळेल. कार्यक्रमादरम्यान आपल्या भाषणात राष्ट्रपती पुढे म्हणाल्या की, "मला सांगण्यात आले आहे की ही थेरपी देशभरातील प्रमुख कर्करोग रुग्णालयांमध्ये उपलब्ध असेल, ज्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना नवीन आशा मिळेल. शिवाय, हा परवडणारा उपचार जगभरातील सर्व रुग्णांसाठी उपलब्ध करुन दिला जाऊ शकतो. हे "वसुधैव कुटुंबकम्" च्या आमच्या व्हिजनशी सुसंगत असेल. कर्करोगाशी लढण्यासाठी आम्हाला एकता आणि दृढनिश्चय आवश्यक आहे. आम्हाला आशा आहे की, यासारख्या नवकल्पना आपल्याला आपले ध्येय साध्य करण्यात मदत करतील.

## लाचखोर पोलीस निरीक्षकाच्या घरा वर छापा कोट्यावधीची मालमत्ता जप्त.

**दैनिक वादळ वार्ता सिन्नर/सुरेश इंगळे**

प्रतिबंधात्मक कारवाई करू नये यासाठी तक्रारदाराकडून दीड लाख रुपये लाच घेताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकांनी दत्तात्रय सखाराम शिंदे (रा. बीड) याला रंगेहात पकडले .त्यांच्याकडून सुमारे ५० लाख रुपये ,सोने चांदीचे दागिने ,सव्वा लाखाची रोकड व एक कोटी ७५ लाख रुपयांच्या मालमत्तेची कागदपत्र आढळून आली या प्रकरणात अटक झालेल्या शिंदे सह इतर दोघांना न्यायालयाने दीड दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. शिंदे सह हवालदार नितीन आनंदराव मोहने व अशोक साहेबराव पाटील दोघे( रा. देवपूर ,धुळे) अशी संशयित लासखोर पोलिसांची नावे असून तक्रारदारावर प्रतिबंधात्मक कारवाई करू नये त्या मोबदल्यात शिंदे यांच्या सांगण्यावरून इतर दोघांनी दोन लाख रुपयांची लाच मागितली असता तक्रारदार यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे माहिती दिली असता लाचलुचपत विभागाने सापळा रचून संशयितांनी पंचासमोर तळजोड करीत दीड लाख रुपयाची लाच स्वीकारत असताना पथकाने त्यांना रंगेहात पकडले. तिघा विरोधात दोंडाईचा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दरम्यान विभागाने संशयीताच्या घराची झडती घेतली असता, ५९ लाख रुपयाचे ९०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, दहा लाख रुपयाचे चांदीचे दागिने एक लाख २६ हजार रुपयाची रोकड, स्वतः पत्नी व इतर नातलगाच्या नावे असलेली एक कोटी ७५ लाख रुपयांच्या मालमत्तेची कागदपत्र जप्त करण्यात आले आहेत. शिंदे व इतर दोघे यांना न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणेंचे बीड जिल्ह्यात जंगी स्वागत

### बीड जिल्हयात तुतारीचा अवाज खणखणणार

**वादळवार्ता/बीड**

लोकसभेला माझ्या विरुद्ध उभे उमेदवार यांनी जिल्ह्याचा काही विकास केला नाही यामुळे माझ्यासमोर खऱ्या अर्थाने त्यांचे आव्हानच नाही असे प्रतिपादन महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांनी धानोरा ता. आष्टी येथे केले. उमेदवारी जाहीर झाल्या नंतर महाविकास आघाडीचे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे धानोरा तालुका आष्टी येथे आले असता त्यांनी गावकऱ्यासमोर बोलताना सांगितले की, भाजपच्या खासदाराने जिल्ह्याचा कोणताही विकास केलेला नाही. त्यामुळे मी विकासाला आव्हान समजणारा



कार्यकर्ता असून त्यांनी विकास केला नाही तर माझ्यापुढे आम्हालाच म्हणता येणार नाही. बीड जिल्ह्यातील जनता त्यांच्या कामावर समाधानी नसून त्यांना बदल हवा आहे. मागील निवडणुकीमध्ये मला पाच लाख दहा हजार मतदारांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला मतदान केले त्यांचा सन्मान राखण्यासाठी मी निवडणूक लढवीत आहे.. मी जनतेशी एकनिष्ठ असून कोणत्याही जातीपातीचा नाही तर मी स्वाभिमानी कार्यकर्ता म्हणून निवडणुकीच्या मैदानात उतरलो आहे. दहा वर्षात काही विकास करू शकले नाहीत ते पुढे काही करू शकणार नाहीत. सामान्य जनता आणि गोरगरी जनता हेच खऱ्या अर्थाने माझे आई-वडील असल्याचा त्यांनी सांगितले यावेळी त्याचे सोबत पक्षाचे प्रवक्ते महेबूब शेख, माजी आमदार देरेकर नाना, किशोर नाना हंबर्डे, परमेश्वर काका शेळके सरपंच सुभाष शेळके, सरपंच एकशिंगे, ग्रामपंचायत सदस्य राहुल शेळके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## नवरत्न फाऊंडेशन अंतर्गत नवरत्न ओल्डेज होमचा ७ वा वर्धापनदिन संपन्न...

### ७०० दिव्यांचे दीप प्रज्वलन करत आजी-आजोबां साठी विविध संगीत, नाटक गप्पा गोष्टीचे आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/पंकज भंडारी**

पुणे येथील सिंहगड रोड येथे असलेल्या नवरत्न फाऊंडेशन, अंतर्गत नवरत्न ओल्डेज होमचा १एप्रिल या दिवशी ७ वा वर्धापन दीन साजरा करण्यात आला. त्या फाऊंडेशन ८ व्या वर्षात पदार्पण केले. पुणे , सिंहगड रोड येथे असलेल्या नवरत्न फाऊंडेशन मध्ये विविध संगीत , नाटक , गप्पा गोष्टी व मनोरंजनाचे कार्यक्रम घेण्यात आले. त्या मध्ये असलेल्या आजी- आजोबांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती उपस्थित होते. मनोहर कोलते , डॉ. राजेंद्र भवाळकर, डॉक्टर दीपक पाठक , एडवोकेट अभिजीत पिंगळे , नंदिनी बांदल ,शोभा बल्लाळ, छायाताई भगत , प्रज्ञा कांबळे , सोनाली ताई , रेखा ताई ,स्वातीताई डिंपल इंगळे , एस एस सावंत सर अनिल घोडे , उदय कुलकर्णी , सुर्वेश जोशी , वसीम सर , मोहित सर , पराग



शिळीमकर , आप्पा घोरपडे उमेश महाडिक , संतोष मस्के रमेश चव्हाण, विजय जगदाळे , सकाळ पत्रकार विठ्ठल तांबे, सुप्रिया शिळीमकर आणि संगीत कार्यक्रम नियोजन सोनल गोडबोले ,मधुर कुलकर्णी, श्रद्धा जहागीरदार, सुहासिनी कंजारकर, नितीन कुलकर्णी, डॉ. सुधाकर देशपांडे , महेश कोकजे,मिलिंद खुरसाळे व रोटरी क्लब ऑफ पुणे मिड इस्टचे अध्यक्ष अंबालाल ओसवाल,डॉ. आनंद केंच जायंट्स ग्रूप ऑफ पुणे मेनचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. अशा वृध्दाश्रमांना वृद्धाश्रम न म्हणता जेष्ठाश्रम असे म्हणावे असे आवाहन रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष डॉ.राजेंद्र भवाळकर यांनी केले.निरनिराळ्या वृद्धाश्रमात अॅडल्ट डायपरची कमतरता असते त्यामुळे वस्तुरुपात देणगी देताना असे अॅडल्ट डायपर भेटवस्तु म्हणुन द्यावेत.आजी आजोबांना वेळ द्यावा प्रेम माया जिव्हाळा आपुलकी या भावनिक गौष्टी या आजी आजोबांना देण्यासाठी समाजभान राखुन नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन या वृद्धाश्रमाचे मानद सल्लागार डॉ.राजेंद्र भवाळकर यांनी या प्रसंगी व्यक्त केले. आयोजक रोहन राकडे व मंगेश कडू , सुरेखा जागडे यांनी सर्वांचे आभार मानले.

## म. ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त

# भारतीय बौध्द महासभा व मुप्टा शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**वादळवार्ता/शिरूर कासार**

शिरूर कासार तालुका भारतीय बौध्द महासभा व मुप्टा शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने, महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उदघाटन शिरूर कासार तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा. शेख जमीर साहेब यांच्या हस्ते होणार आहे. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौध्द महासभा शिरूर कासार तालुकाध्यक्ष आयु. बाळासाहेब बोराडे असणार आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये नगरसेवक श्री. वसंत काटे, प्राचार्य आप्पासाहेब येवले, जयदत्त क्षीरसागर साहेब यांचे स्वीय सहाय्यक प्रा. महारुद्र डोंगरे , मुप्टा शिक्षक संघटनेचे ज्युनियर विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत जावळे व जिल्हा सचिव प्रा. नारायण घोलप आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरपंचायत चे बांधकाम सभापती अरुण भालेराव ,नगरसेवक गणेश तळेकर, गटनेते गणेश भांडेकर, सभापती अक्षय रणखांब, रिपब्लिकन पँथर राज्य सचिव युवराज सोनवणे, माजी नगरसेवक आनंद जावळे, सौ उषाताई सरवदे सभापती पंचायत समिती, प्राचार्य





आर. बी. जायभाये, प्राचार्य श्रीमती अस्मिता जावळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदर स्पर्धेसाठी इयत्ता आठवी ते बारावीचे विद्यार्थी पात्र असतील. या वक्तृत्व स्पर्धेचे विषय व नाव नोंदणी करण्यासाठी प्रा. डॉ.आत्माराम झिंजुर्डे, प्रा.नारायण तांबे , जयेंद्र निकम, प्रा. विनोद गलांडे , श्रीमती अनिता लाटे मॅडम यांच्याशी संपर्क साधावा.

सदर स्पर्धा दिनांक १० एप्रिल २०२४ बुधवार रोजी सकाळी ०९.०० वाजता टॅलेंट हब , पार्थ कॉम्प्लेक्स, शिरूर कासार येथे होणार आहे. या स्पर्धेचे बक्षीस प्रथम २१०० रुपये रोख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय १५०० रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तिसरे पारितोषिक १००० रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र अशा स्वरूपाचे असणार आहे. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन मुप्टा शिक्षक संघटनेचे ज्युनियर विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत जावळे व जिल्हा सचिव प्रा नारायण घोलप, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब बोराडे, संयोजक रोहन जोगदंड ,प्रा.अमर खोले, विशाल बलैया, आशिष भालेराव, विशाल सरवदे, प्रा. अक्षय साळवे, प्रा.राजकुमार केदार , अक्षय यादव , प्रा संदीप सटले,प्रा.संदिप आंधळे आदींनी

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )